RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ५२] गुरुवार, जुलै ३०, २०२६/ श्रावण ८, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ४.००

असाधारण क्रमांक १२३

प्राधिकृत प्रकाशन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जुलै, २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) अधिनियम, २०१५.

क्रमांक शुनिप्रा-२०२६/प्र.क्र.१८१/तांशि-४.— ज्याअर्थी, महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) च्या कलम ११ ची पोट-कलमे (१), (२), (३) व (४) तसेच कलम १२ द्वारे, प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, काढलेली शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१५/(७२/१५)/ तांशि-४, दिनांक १८ मार्च, २०१६ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा केला आहे) याद्वारे, महाराष्ट्र शासनाने, उक्त अधिनियमान्वये, प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व नेमून दिलेले कार्य पार पाडण्याकरिता शुल्क नियामक प्राधिकरण (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त प्राधिकरण" असा केला आहे) घटित केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाच्या अध्यक्ष व काही सदस्यांचा पदावधी संपुष्टात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (३) च्या खंड (क), (ख), (ग), (घ) व (ङ) च्या तरतुदींनुसार उक्त प्राधिकरणावर अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करणे इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ११ ची पोट-कलमे (३) व (४) आणि कलम १२ द्वारे, प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (३) च्या खंड (क), (ख), (ग), (घ) व (ङ) च्या संबंधित तरतुदींनुसार श्री. शेखर चन्ने, सेवानिवृत्त सचिव यांची उक्त शुल्क नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून व डॉ. मुरलीधर गोविंदराव चांदेकर, माजी कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, श्री. श्रीकांत मोहन लिमये, सनदी

लेखापाल, श्री. अश्विन मधुसूदन सोलंकी, परिव्यय लेखापाल, श्री. दत्तात्रय व्यंकटराव जाधव, व्यावसायिक शिक्षण तज्ज्ञ यांची उक्त शुल्क नियामक प्राधिकरणाचे सदस्य म्हणून त्यांचा पदावधी त्यांनी त्यांचे पद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा किंवा ते वयाची सत्तर वर्षे पूर्ण करेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तो असेल आणि त्या प्रयोजनार्थ, उक्त अधिसूचनेत पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

परिच्छेद दोन मधील, नोंदी (१) ते (५) ऐवजी, पुढील नोंदी दाखल करण्यात येतील :—

अ. क्र.	नियुक्त व्यक्तीचे नाव व तपशिल	प्राधिकरणावरील पदनाम
१.	श्री. शेखर चन्ने, सेवानिवृत्त सचिव	अध्यक्ष
२.	डॉ. मुरलीधर गोविंदराव चांदेकर, माजी कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती	सदस्य
३.	श्री. श्रीकांत मोहन लिमये, सनदी लेखापाल	सदस्य
४.	श्री. अश्विन मधुसूदन सोलंकी, परिव्यय लेखापाल	सदस्य
५.	श्री. दत्तात्रय व्यंकटराव जाधव, व्यावसायिक शिक्षण तज्ज्ञ	सदस्य

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संतोष खोरगडे,
शासनाचे सहसचिव.

HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 30th July, 2026.

NOTIFICATION

Maharashtra Professional Educational Institutions (Regulation of Admissions) and Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Fees) Act, 2015.

No. Shunipra-2026/C.R.181/TE-4.— Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, No.MISC-2015/(72/15)/T.E.-4, dated the 18th March 2016 (hereinafter referred to as "the said notification"), issued in exercise of the powers conferred by sub-sections (*1*), (*2*), (*3*) and (*4*) of section 11 read with section 12 of the Maharashtra Professional Educational Institutions (Regulation of Admissions) and Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015) (hereinafter referred to as "the said Act"), constituted the Fees Regulating Authority (hereinafter referred to as "the said Authority") to exercise the powers conferred on and discharge the functions assigned to it under the said Act;

And whereas, term of office of the Chairperson and some of the Members of the said Authority has expired;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to appoint the Chairperson and Members on the said Authority, as per the provisions of clauses (*a*), (*b*), (*c*), (*d*) and (*e*) of sub-section (*3*) of section 11 of the said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*3*) and (*4*) of section 11 read with section 12 of the Maharashtra Professional Educational Institutions (Regulation of Admissions) and Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Fees) Act, 2015, the Government of Maharashtra hereby appoints Shri Shekhar Channe, Retired Secretary as a Chairperson and Dr. Murlidhar Govindrao Chandekar, Former Vice-Chancellor, Sant Gadgebaba Amravati University, Amravati, Shri Shrikant Mohan Limaye, Chartered Accountant, Shri Ashwin Madhusudan Solanki, Cost Accountant, Shri Dattatray Vyankatrao Jadhav, Expert in Professional Education as the Members of the said Fees Regulating Authority, as per the respective provisions of clauses (*a*), (*b*), (*c*), (*d*) and (*e*) of sub-section (*3*) of section 11 of the said Act, for the term of three years from the date they assumes their offices or until they attains the age of seventy years, whichever is earlier and for that purpose, amends the said notification as follows, namely:-

In paragraph 2, for entries (1) to (5), the following entries shall be substituted, namely :—

Sr. No.	Name and Profile of the Appointee	Designation in Authority
1	Shri Shekhar Channe, Retired Secretary	Chairperson
2	Dr. Murlidhar Govindrao Chandekar, Former Vice-Chancellor, Sant Gadge baba Amravati University, Amravati,	Member
3	Shri Shrikant Mohan Limaye, Chartered Accountant	Member

Sr. No.	Name and Profile of the Appointee	Designation in Authority
4	Shri Ashwin Madhusudan Solanki, Cost Accountant	Member
5	Shri Dattatray Vyankatrao Jadhav, Expert in Professional Education	Member

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANTOSH KHORGADE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.